डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील
पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधन प्रबंधाचा संक्षीप्त गोषवारा

● संशोधनाचा विषय ●

'बंजारा तांडयाचे बदलते स्वरूप : एक व्यष्टी अध्ययन'

(विशेष संदर्भ : जालना जिल्हा)

● संशोधक ●

सुनिल व्यंकटेश सामग

सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि.जालना.

● मार्गदर्शक ●

डॉ.दादासाहेब उत्तमराव मोटे

सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अंबड जि.जालना.

जुलै २०१३

"बंजारा तांड्याचे बदलते स्वरूप : एक व्यष्टी अध्ययन"

(विशेष संदर्भ : जालना जिल्हा)

प्रस्तावना :

भारतीय समाजव्यवस्थेत जातीव्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व आहे. भारतीय समाज हा सुमारे ६००० जाती-पोटजातींचा मिळून बनलेला आहे. या समाजात प्रत्येक जाती-जमातीची एक स्वतंत्र रूढी-परंपरा असून त्या जाती -जमाती अंतर्गत असलेल्या पोटजाती किंवा तत्सम जमातींचीही वेगवेगळी व स्वतंत्र अशी जीवनप्रणाली भारतीय समाजव्यवस्थेत कार्यरत आहे. कोणत्याही एका जमातीचे लोकजीवन दुसऱ्या जाती-जमातीसारखे आढळत नाही ते भिन्न प्रकारचे आहे. उदा. भाषा, चालीरीती, देवदेवता, उपासना पध्दती इत्यादी.

या पार्श्वभूमीवर एकूणच भटक्या विमूक्त जमातीविषयी सखोल आणि वास्तविक स्वरूपात अध्ययन व संशोधन होणे गरजेचे वाटते. स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या ६०वर्षामध्ये या विमूक्त जमातीमध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, आणि सांस्कृतिक बदलाचे चित्र निश्चितच आशावादी आहे. ६० वर्षापूर्वीचा हा समाज आणि सद्यस्थितीतील समाज यामध्ये काही प्रमाणात बदलाची प्रक्रिया सुरू असल्याचे दिसून येते. या भटक्या विमूक्त जमातीपैकीच स्वत:ची एक आगळी वेगळी वैशिष्टये जपणारी जमात म्हणजे **'बंजारा जमात'** होय.

बंजारा समाज हा भारतीय समाजाचा अविभाज्य घटक आहे. भारतातील २४ घटकराज्य आणि ३ केंद्रशासीत प्रदेशात तो वास्तव्यास असून हा बंजारा समाज विविध नावाने ओळखला जातो. उदा. बंजारा, बनजारा, गोर, गोरमाटी, लमाण, मथुरा, चारण, ढालिया, जोगी, इत्यादी. तसेच या जमातीतही अनेक उपजाती आहेत. अनादी कालापासून ही जमात भ्रमणशील राहीलेली आहे. स्वातंत्र्यानंतर मात्र ही जमात परिवर्तनाच्या वाटेवर आहे. शिक्षण, दळणवळणाची साधने, विविध माध्यमे (Media), औद्योगिकरण, नागरीकरण यासारख्या विविध घटकांचा परिणाम बंजारा जमातीवर झालेला दिसून येत आहे.

म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून या जमातीचा अभ्यास होणे महत्वाचे वाटते.

बंजारा जमातीची एक स्वतंत्र जीवन शैली आहे, विचारशैली आहे, संस्कृती आहे. **'तांडा संस्कृती'** म्हणून ती ओळखली जाते. महाराष्ट्रात बंजारा समाजाची लोकसंख्या ६०,००००० आहे. जालना जिल्हयाचा विचार केल्यास ३५० तांड्यात वास्तव्य करणाऱ्या या समाजाची लोकसंख्या १,५०,००० आहे. म्हणूनच मी बंजारा तांड्याचे सूक्ष्म अध्ययन करण्यासाठी 'व्यष्टी अध्ययन पध्दती' निवडली आहे व त्यासाठी जालना जिल्हयाअंतर्गत मंठा तालुक्यातील 'विरगव्हाण तांडा' हा एकक म्हणून निवडला आहे.

या तांड्याचे वैशिष्टये म्हणजे हा तांडा स्वाध्याय परिवाराचे प्रणेते श्री पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या विचारप्रणालीने प्रभावित झालेला आहे. स्वाध्यायातील विविध प्रयोग येथे राबविले गेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने योगेश्वर कृषी, निर्मलनीर, माधववृंद, शोषखड्डे, व्हीडीओ प्रवचन केंद्र, बालसंस्कार केंद्र, महिला केंद्र, युवा केंद्र, इत्यादीचा उल्लेख करता येईल. स्वाध्यायातील या विविध प्रयोगांचा परिणाम म्हणून या तांड्यास अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ग्रामस्वच्छता, रस्ते दुरूस्ती, कचरा व्यवस्थापन, जलव्यवस्थापन, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती शिवाय आरोग्य व शिक्षण इत्यादी बाबत कृतीकार्यक्रम (स्वाध्याय भाषेत कृतिभक्ती) या तांड्यात प्रभावीपणे राबविले गेले आहेत. तसेच शासनाच्या भारत निर्माण योजना, महात्मा गांधी तंटामूक्त गांव, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, पाणलोट क्षेत्रविकास योजनाही या तांड्यात यशस्वीरित्या कार्यरत आहेत. त्यामुळेच जालना जिल्हयातील एक आदर्श गाव म्हणून या तांड्याकडे पाहिले जाते.

स्वाध्याय विचारप्रणाली सोबतच बाह्य जगतातील विविध माध्यमातून (Media) येत गेलेल्या संपर्कामुळे या तांड्यात परिवर्तन होताना दिसून येत आहे. समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून मी त्याचे निरीक्षण केले आहे. शासनदरबारी ज्या बंजारा जमातीची नोंद 'गुन्हेगारी जमात' म्हणून आहे. ती जमात या तांड्यात स्वाध्याय आणि इतर माध्यमाच्या विचारांमळे पुर्णपणे बदलल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणूनच व्यष्टी अध्ययनासाठी या तांड्याची एकक म्हणून निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :

१) बंजारा जमातीचा इतिहास अभ्यासणे.

२) बंजारा जमातीच्या संस्कृतीचा अभ्यास करणे.

३) शिक्षणाचा, आधुनिकीकरणाचा बंजारा जमातीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

४) बंजारा जमातीतील झालेल्या बदलांचा सामाजिक-आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीकोणातून अभ्यास करणे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी 'व्यष्टी अध्ययन पध्दतीचा' वापर केला आहे. व त्यासाठी एकक म्हणून जालना जिल्हयांतर्गत मंठा तालुक्यातील 'विरगव्हाण तांडा' निवडला आहे. बंजारा तांड्यातील सामाजिक- आर्थिक - सांस्कृतिक बदलाचे सूक्ष्म अध्ययन करणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी आवश्यक तेवढे संदर्भ ग्रंथ घेऊन तथ्य मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्यक्ष तांड्यात जाऊन १३५ कुटूंबापैकी ११५ कुटूंबाची माहिती **'मुलाखत - अनुसूची'** या तंत्राद्वारे संकलित केली आहे. (उर्वरीत २० कुटूंबे स्थलांतरीत झाली आहेत) सोबतच निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली या तंत्राचा वापर करून निष्कर्ष प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. विवेचनाशिवाय विश्लेषण पध्दतीवर भर देण्यात आला असून संकलीत केलेली तथ्ये आलेखाच्या साह्याने चित्ररूप दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.

गृहितकृत्ये :

प्रस्तुत संशोधनाच्या संबंधी खालील विधानांची गृहितकृत्ये म्हणून निवड केलेली आहे.

१) सद्य : स्थितीत बंजारा जमातीचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावलेला आहे.

२) बंजारा समाजातील भाषा, साहित्य, संस्कृती, राहणीमान, खानपान यामध्ये बदल झालेला आहे.

३) तांडा - संस्कृती परिवर्तनाच्या वाटेवर आहे.

संशोधन क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय हा समुदाय एकक म्हणून एका तांड्यापूरता मर्यादित असला तरी त्याची व्याप्ती विरगव्हाण तांड्यासारखी समान स्थिती असणाऱ्या देशातील इतर तांड्याच्या विकासासाठी सामान्यीकरण होऊ शकते. संशोधनासाठी जो तांडा एकक म्हणून निवडलेला आहे तो इतर तांड्याचे प्रतिनिधीत्व करणारा आहे याची जाणीव असल्यामुळे विषय एककाची सूक्ष्म,सखोल सर्वकष व तपशीलवार माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.प्रस्तुत संशोधन हे निर्दोष असावे. यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केलेला आहे.

तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाच्या तथ्य संकलनासाठी खालील स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे.

१) प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत अध्ययनाच्या प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत व निरीक्षण या तंत्राचा वापर करून तांड्यातील ६५० लोकसंख्या व १३५ कुटूंबापैकी ११५ कुटूंबाची माहिती 'मुलाखत-अनुसूचि' या तंत्राद्वारे संकलीत करण्यात आली आहे.

२) द्वितीय स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनासाठी प्रकाशीत आणि अप्रकाशित साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये मुख्यत्वे करून संदर्भ ग्रंथ, शासकीय कार्यालयीन माहिती,पोलीस कार्यालयातील माहिती, चित्रे फोटो वर्तमानपत्रे,तुरूंग, कोर्ट,साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, एम.फील, पीएच.डी.चे संशोधन प्रबंध, संशोधन अहवाल इ. चा उपयोग करून घेण्यात आला आहे.

संशोधनाची उपयोगिता :

प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता खालील प्रमाणे मांडता येईल.

१) प्रस्तुत संशोधनातील एकक 'विरगव्हाण तांडा' हा परिवर्तनाचे प्रारूप (Model) म्हणून गृहित धरल्यास इतर तांड्यांना (विशेषत: जालना जिल्हयातील) हे संशोधन निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

२) 'भक्ती ही सामाजिक शक्ती आहे' भक्ती म्हणजे भगवंताची खुशामत नसून ती एक वृत्ती आहे, समज (Undestanding) आहे. **भक्ती** हा स्वाध्याय विचारांचा मुख्य गाभा मानला जातो. भक्तीच्या माध्यामातूनच विविध प्रयोग निर्माण झाले आहेत व या प्रयोगातून ग्राम विकासाला चालना मिळाली आहे. 'विरगव्हाण तांडा' हे त्याचे उदाहरण देता येईल त्यामुळेच या संशोधनाची उपयुक्तता इतर तांड्यासाठी मोलाची ठरेल.

३) **'योगेश्वर कृषी'** हा स्वाध्याय कार्यातील विलक्षण प्रयोग आहे. (समुहाने करावयाची शेती) त्यातून खऱ्या अर्थाने सामाजिक - आर्थिक क्रांती शक्य आहे. 'योगेश्वर कृषी' या प्रयोगातून मिळणारी संपत्ती ही महालक्ष्मी होय. म्हणजे ईश्वराचे धन होय. या संपत्तीचा विनियोग ईश्वरप्रसाद म्हणून समाजातील गरजू बंधू - भगीनींसाठी केला जातो. त्यातून माणूस उभा राहतो. गावातील लोकांमध्ये एखादा व्यक्ती भूकेला व भिकारी राहता कामा नये तसेच एखाद्या व्यक्तीमध्ये न्यूनगंड व अहंगड ही निर्माण होऊ नये हा या प्रयोगामागील हेतू आहे. म्हणूनच 'योगेश्वर कृषी' हा प्रयोग वरकरणी आर्थिक - सामाजिक असला तरी मुख्यत: तो नवमानवनिर्मितीचा प्रयोग आहे. यातून ग्रामस्थांचा आर्थिकस्तर तर उंचावतोच पण विचारांची बैठक देखील पक्की होते.

त्यामुळेच प्रस्तुत संशोधन हे ग्रामविकासाची उद्दीष्टये साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरले असे वाटते.

४) भूगर्भजलसंचय (निर्मलनीर,शोषखड्डा,विहिरपुनर्रभरण इ.) या प्रयोगातून केवळ, पाण्याचा विचार नाही तर पाणी बनविण्याचा विचार केला पाहिजे. हा महामंत्र दिला जातो. त्यामुळे जलव्यवस्थापन नेटकेपणे होऊ शकते. पाणी आणि पाण्याचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी व आरोग्य विषयक जाणीव जागृतीसाठी हे संशोधन मार्गदर्शक ठरेल.

५) माधववृंद, वृक्षमंदीर या प्रयोगाद्वारे वृक्षामध्ये वासुदेव पाहण्याची दृष्टी मिळते. त्यामुळे केवळ वृक्षारोपन केले जात नाही तर त्याचे संवर्धन ही होते. पर्यावरणाचे संतूलन राखण्यासाठी हा विचार महत्वाचा ठरतो. त्यामुळेच या संशोधनाची उपयोगिता परिणामकारक होईल असे वाटते.

६) आत्मविश्वास आणि ईशाविश्वास हाच परिवर्तनाचा मूलमंत्र आहे असे स्वाध्यायी मानतात. स्वाध्याय केंद्रातून ही शिकवण मिळाल्यामुळे तांड्यातील लोकांचा आत्मविश्वास बळावल्यामुळे तांडा विकास प्रक्रियेला अपेक्षित आणि निश्चित दिशा देण्यासाठी हे संशोधन उपयुक्त वाटते.

७) केवळ भावनीक विचार न करता जीवनाच्या प्रत्येक बाबींकडे चिकित्सक आणि विवेकपणे (डोळसपणे) पाहिले तर व्यक्ती कठीणातील कठीण ध्येय सहज साध्य करू शकते या विचारसरणीमुळेच शिक्षणाचे महत्त्व अधोरेखीत होते. शिक्षणातून ग्रामविकासाची दिशा निश्चित ठरते. यासाठी देखील प्रस्तुत संशोधन उपयोगी ठरेल.

८) शरीर हे केवळ शरीर नाही तर देवाचे मंदीर आहे. (काया ही पंढरी; आत्मा हा विठ्ठल) ईश्वर हा दुरस्थ, तटस्थ वा स्वर्गनिवासी नसून तो हृदयस्थ आहे. 'सर्वस्य चाहं हृदी सन्निविष्ट:' असे गीता सांगते या मौलिक विचारांतूनच व्यक्ती व्यसनमूक्त होतो. आरोग्याची काळजी घेतो, दुष्कृत्यापासून दुर रहतो. चारित्र्यसंपन्न बनण्याचा प्रयत्न करतो. प्रस्तुत एककाचे अध्ययन हे त्यामुळेच इतर व्यक्ती व तांड्यासाठी अधिक उपयुक्त वाटते.

९) परस्पर प्रेम आणि विश्वासामुळेच कोणताही विकास शक्य आहे. यामुळेच समुह भावना वाढीस लागते. प्रस्तुत संशोधनाचे एकक हे समुह भावनेतून विकास कसा होतो याचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

१०) विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि लोकसहभागातून ग्रामविकास साध्य करण्यासाठी हे संशोधन सहाय्यक ठरेल.

विषय मांडणी :

प्रस्तूत संशोधन विषयाची मांडणी खालील सात प्रकरणामध्ये करण्यात आलेली आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना :

संशोधनातील पहिल्या प्रकरणामध्ये सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, स्वातंत्र्य-पूर्वोत्तर काळातील सामाजिक परिवर्तनासंदर्भातील स्वरूपाबाबतचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधनाची उद्दिष्ट्ये निवडलेली गृहितकृत्ये, प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात उपलब्ध काही निवडक विचार व विचारवंताच्या साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रा.भिमराव राठोड, भाऊ धन्नु राठोड, डॉ.रूख्मीणी पवार, डॉ.उमाकांत राठोड, प्रा.मोतीराज राठोड, खा.हरिभाऊ राठोड, स.सो.खंडाळकर, डॉ.यशवंत जाधव, इत्यादी विचारवंताच्या साहित्याचे सिंहावलोकन केले आहे. या शिवाय सशोधनाच्या विषयमांडणीची पार्श्वभूमी व इतर अनुषांगीक बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन पध्दती :

संशोधनाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन कार्यासाठी उपयोगात आणलेली संशोधन पध्दती, निवडलेला विषय व इतर संबंधीत घटकांचा आलेख मांडण्यात आला आहे. या अध्ययनासाठी व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. ही अध्ययन पध्दती एककाचे सूक्ष्म, परिपूर्ण, विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यासाठी समुदाय एकक म्हणून जालना जिल्हा अंतर्गत मंठा तालुक्यातील विरगव्हाण तांडयाची निवड केली आहे.

उपरोक्त तांड्यातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व ऐतिहासिक घटकांचा अभ्यास करून तांड्यातील परिवर्तनकारक घटकांची अहवाल स्वरूपात मांडणी केलेली आहे. त्यासाठी 'मुलाखत -अनुसूची' व निरीक्षण या प्राथमिक स्त्रोताचा तसेच संदर्भग्रंथ, वाङमयीन साहित्य, विविध लेख, शासकीय कार्यालयीन माहिती, चित्रे, फोटो, पोलीस कार्यालय, तुरूंग,कोर्ट, प्रमाणपत्रे, मानपत्रे, दैनिके, मासिके,इत्यादी चा दुय्यम स्त्रोत म्हणून उपयोग करण्यात आलेला आहे. याशिवाय प्रकाशित अप्रकाशित साहित्याचा उपयोग व तत्सम माहिती संकलित करून अध्ययन करण्यात आलेले आहे.

प्रकरण तिसरे

बंजारा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

प्रस्तूत प्रकरणामध्ये 'बंजारा' शब्दांच्या उत्पत्तीचे विविध अर्थ व स्वरूपाची मांडणी करण्यात आलेली आहे. बंजारांचे मूळ वसतीस्थान, त्यांचा व्यवसाय, आहार- विहार, बोलीभाषा, राहणीमान, चालीरीती, विवाहाचे स्वरूप, उत्सवदर्शन, (सण समारंभ), कुळ (गोत्र), उपासना पध्दती, जन्म-मृत्यू संस्कार, त्यांचा अन्य धर्माशी असलेला संबंध, तांड्याची रचना, बंजारा जात-पंचायत, भटके प्रवृत्ती (भ्रमंती), गुन्हेगारीवृत्ती या सर्व घटकांचे ऐतिहासिक पुनरावलोकन करण्यात आलेले आहे.

याशिवाय बंजारा जमातीचा हजारो वर्षापूर्वीचा यात्रापथ, 'लमाणमार्ग' त्यांची शिकार पध्दती, आरोग्य विषयक धोरण इत्यादी बाबींचा आढावा या प्रकरणामध्ये घेण्यात आलेला आहे.

प्रकरण चौथे

जालना जिल्हयातील बंजारा समाज :

संशोधनाच्या या प्रकरणामध्ये जालना जिल्हयातील एकूण तांड्याची संख्या, बंजारा समाजाची लोकसंख्या इतर समाजाच्या तुलनेत त्यांचे विविध क्षेत्रातील स्थान या बाबींचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

जालना जिल्हयातील बंजारा समाजाचे विविध क्षेत्रातील योगदान व कार्य या बाबतचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, व्यापारी, डॉक्टर्स, विविध क्षेत्रातील अधिकारी, वकील, शेतकरी कामगार, महिला, युवक, इत्यादी विविध क्षेत्रातील प्रातिनिधीक स्वरूपाची माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक त्यावेळी प्रश्नावली, मूलाखत, निरीक्षण तंत्राचा उपयोग प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

प्रकरण पाचवे

विरगव्हाण तांड्याचा सामाजिक-आर्थिक बदल :

प्रस्तुत प्रकरणामध्ये विरगव्हाण तांड्याची रचना व स्वरूपाबाबत विवेचन करण्यात आलेले आहे. शिक्षण, दळणवळणाची साधने, माध्यमे (Media) या घटकांचा प्रभाव तांड्यातील सामाजिक, आर्थिक बदलास कसा कारणीभूत ठरला आहे हे मूलाखत अनुसूची तंत्राद्वारे तांड्यातील ११५ कुटूंबाची माहिती संकलीत करून त्या आधारे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

या प्रकरणामध्ये प्रामुख्याने स्वाध्याय कार्य, स्वाध्यायातील विविध प्रयोग यांचा आढावा घेण्यात आला असून विशेषकरून योगेश्वर कृषी, भूगर्भजलसंचय, साध्यायाची विविध केंद्रे, कुटूंब प्रार्थना, त्रिकालसंध्या, भक्तीफेरी, विद्याप्रेमवर्धन परीक्षा इत्यादी प्रयोगांची संकल्पना स्पष्ट करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. शिवाय शासनाच्या विविध योजना लोकसहभागातून प्रभावीपणे राबविल्यास परिवर्तनाची दिशा निश्चित होते या सर्व बाबींचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

प्रकरण सहावे

बंजारा तांड्याचे बदलते स्वरूप :

बंजारा जमातीची स्वतंत्र जीवनशैली आहे. ती **'तांडा संस्कृती'** म्हणून ओळखली जाते. या प्रकरणामध्ये प्राचीन तांड्याची संरचना व आधुनिक तांड्याची संरचना यांचा तुलनात्मक अभ्यास करून सद्यस्थितीतील तांड्याच्या बदलास कारणीभूत ठरलेल्या घटकांची चिकित्सक स्वरूपात मांडणी करण्यात आलेली आहे.

प्रकरण सातवे

निष्कर्ष :

प्रस्तूत संशोधनासाठी समुदाय एकक म्हणून निवडलेल्या विरगव्हाण तांड्याच्या बदलत्या स्वरूपाची कारणमिमांसा शोधून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. शिक्षण, औद्योगिकरण, नागरीकरण, दळणवळणाची साधने, माध्यमे (Media) इत्यादी घटकाखेरीज स्वाध्याय कार्य व स्वाध्यायातील विविध प्रयोग या सर्वांच्या आधारे निवडलेल्या एककाचे मूल्यमापन करण्यात आले आहे.

प्रस्तूत संशोधनातील निष्कर्ष असे दर्शवितात की, उपरोक्त कारकांमुळे बंजारा तांड्याच्या संरचनेत बदल झालेला आहे. या तांड्याने शासनाच्या विविध योजना प्रभाविपणे राबवुन स्वाध्याय आणि इतर माध्यमांच्या प्रभावाने राज्य, विभाग व स्थानिक पातळीवर विविध पारितोषिके मिळविली आहेत.

सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात प्रस्तुत एककाच्या बदलाचे मूल्यमापन करून ते निष्कर्षरूपात या प्रकरणामध्ये नोंदविले गेले आहेत.

प्रस्तूत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने काही महत्त्वाचे निष्कर्ष खालील प्रमाणे सांगता येतील.

१) शिक्षण, दळणवळणाची साधने, माध्यमे (Media),आणि 'स्वाध्याय विचारांच्या' संपर्कामुळे विरगव्हाण तांड्यातील लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण झाली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध ग्रामविकास योजनांची (उदा.भारत निर्माण योजना, संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान इ.) प्रभावीपणे अंमलबजावणी केली आहे.

२) तांड्यातील १३५ कुटूंबापैकी ९० कुटूंबांनी आपल्या घरासमोर शोषखड्डा तयार केला असून त्याचा फायदा त्यांच्या कुटूंबातील आरोग्यावर झाला आहे.

३) लोकसहभागातून शेजारील गावामध्ये **'निर्मलनीर'** (लघु बंधारा) हा प्रयोग उभारण्यात आला आहे.

४) स्वाध्याय कार्यातील सामाजिक-आर्थिक क्रांती घडून आणणारा **'योगेश्वर कृषी'** हा मुख्य प्रयोग आहे. या प्रयोगाशी तांड्यातील २०% लोक कृतीशील म्हणून जोडले गेले आहेत व यामध्ये महिलांचा सहभाग ५०% आहे.

५) **'भूगर्भजलसंचय'** या प्रयोगामुळे तांड्यातील पाणी पातळी वाढली आहे.

६) **'विद्याप्रेमवर्धन परीक्षा'** या प्रयोगातून होणाऱ्या नियमीत अभ्यासवर्गामुळे अभ्यासाची -शिक्षणाची रूची निर्माण झाली आहे.

७) स्वाध्याय विचारांच्या संपर्कामुळे व आचरणामुळे सद्यस्थिती तांड्यातील ५०% लोकांनी व्यसने सोडली आहेत व चोरी करण्याचे प्रमाणही कमी झाले आहे.

८) सद्यस्थिती तांड्यातील लोकसख्येपैकी ७०% लोक त्रिकालसंध्या नियमीत म्हणतात व ४०% कुटूंबामध्ये सायंप्रार्थना (कुटूंबप्रार्थना) चालते.

९) संस्कृत भाषेतील स्त्रोत्रे, अष्टके, तांड्यातील २०% लोकांनी मूखोद्‌गत केले आहेत यामध्ये निरक्षर स्त्री-पुरूषांचे प्रमाण विशेष रूपाने दिसून आले आहे.

१०) विरगव्हाण तांड्यातील ७०% लोकसंख्या ही **'अष्टांमृत केंद्राच्या'** माध्यमातून (बालक, युवक-युवती, स्त्री-पुरूष व वृध्द इ.) स्वाध्याय विचारांशी जोडली गेलेली आहेत.

● मार्गदर्शक ●

डॉ.दादासाहेब उत्तमराव मोटे

सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अंबड जि.जालना.

● संशोधक ●

सुनिल व्यंकटेश सामग

सहाय्यक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख,
संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि.जालना.